Patbandhare Vibhag Aurangabad Recruitment 2020

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग

नांदूर-मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

E-mail : nmidvjp@gmail.com

# जाहीर सूचना

नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर या कार्यालयांतर्गत वर्ष 2020-21 चे रब्बी हंगाम व उन्हाळी हंगामातील सिंचनाच्या कामासाठी सेवा करार तत्त्वावर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करण्यासाठी चांगला अनुभव असलेले सरकारी सेवानिवृत्त शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदासाठी करार पद्धतीने पारिश्रमिक तात्पुरती नियुक्ती करणेबाबतची जाहीर सूचना.

**संदर्भ** : - 1. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि-2018/प्र.क्र. 113/आ.पु.क. दि. 11/12/18

2. मा. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांचे पत्र क्र. आ-1/2729 दिनांक 28/09/2020

## अर्ज करण्याची पद्धत व सर्वसाधारण सूचना खालीलप्रमाणे

1. अर्जदाराचे फूलस्केप कागदावर स्वतःचे संपूर्ण नाव (ठळक अक्षरांत), जन्मदिनांक, वय, लिंग, पत्र व्यवहाराचा पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम, तसेच सध्या मिळणारे निवृत्तीवेतन याबाबतचा तपशील टंकलिखित करून अर्ज सादर करावा.
2. वयोमर्यादा दिनांक 30/11/2020 पर्यंत 64 वर्षापेक्षा वय जास्त नसावे.
3. उमेदवाराने त्यांचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर चिकटवावा.
4. अर्जदारावर कोणताही फौजदारी गुन्हा नसावा. विभागीय चौकशी/कारवाई चालू अथवा प्रस्तावित नसावी.
5. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.
6. नियुक्ती करावयाच्या पदांची संख्या विभागाच्या अंतर्गत एकूण रिक्त पदांच्या 70% च्या मर्यादित राहील.
7. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून, ती केव्हाही पूर्व नोटीस न देता संपुष्टात आणली जाईल.
8. अर्जदारास तात्पुरत्या स्वरूपाची नियुक्ती दिल्यानंतर त्यांना विभागांतर्गत कार्यक्षेत्रावर/कार्यालयात काम करावे लागेल, याची अर्जदाराने नोंद घ्यावी.
9. कोणताही अर्ज स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
10. अभियंत्यांची आसनव्यवस्था विभागात अंतर्गत राहील.

**अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत : दिनांक 16/10/2020**

**अर्ज पाठविण्यासाठी व मुलाखतीचा पत्ता :**

**कार्यकारी अभियंता,**

**नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर (423 701)**

**नियुक्तीचा कालावधी : 11 महिने**

**अर्जासोबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्रे जोडावीत.**

1) पेन्शन पे ऑर्डर छायांकित प्रत.
2) शैक्षणिक अर्हता असणाऱ्या व इतर परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती.
3) मुलाखतीच्या वेळी वरील कागदपत्रांच्या सर्व मूळ प्रती सोबत आणाव्यात.
4) मुलाखतीचा दिनांक व वेळ दिनांक 20/10/2020 सकाळी 11.30 वा. आहे, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता**
**नांदूर-मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर**

स्वाक्षरित/-
**(वाय.ए. सुरासे)**
**उपकार्यकारी अभियंता**
**नांदूर-मधमेश्वर पाटबंधारे विभाग, वैजापूर**

स्थळप्रत का.अ. यांचे स्वाक्षरित